# ॥ केवळ माझा सह्यकडा ॥

भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा
गौरिशंकर उभ्या जगाचा मनात पूजिन रायगडा

तुमच्या अमुच्या गंगा यमुना केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ प्यार मला छाती निधडी

मधुगुंजन लखलाभ तुम्हाला बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते तुकयाचा आधार मला

धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली मी चुम्बिन माती

या मातीचे कण लोहाचे तृणपात्याना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातुनि अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

कबीर माझा तुलसी माझा ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परि माझा नाम्याचा नाच

जनी जनार्दन बघणारा तो एका हृदयी एकवटे
जनाबाईच्या ओवीमध्ये माझी मजला खूण पटे

इन्द्रायणिच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळिक कायमची झाली

भक्तीचा मेळा दाटे
चोख्याची पैरण फाटे

निर्गुण मानवतेची पूजा करणारे करु देत भले
माझ्यासाठी भीमाकाठी भावभक्तिची पेठ खुले ॥

रामायण तर तुमचे अमुचे भारत भारतवर्षाचे
छत्रपतींची वीर कहाणी निधान माझ्या हर्षाचे

रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरि मजला रुचते
हृदयाच्या हृदयात परन्तु बाजी बाजीची सुचते

अभिमन्युचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचा शेवटचा तो शब्द अजुन हृदयामाजी

बच जाये तो और लढे
पाउल राहिल सदा पुढे

तुम्हास तुमचे रुसवे फुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठी राहिल गाठी मरहट्ट्याचा हट्ट खरा

तुमचे माझे ख्याल तराणे दोघेही ऐकू गझला
होनाजींची सोनलावणी वेड लावते परि मजला

मृदंग मोठा सुमधुर बोले मंजुळ वीणा अन मुरली
थाप डफाची कडकडता परि बाही माझी फुरफुरली

कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनी माझ्या हृदयकवाडा तोच पवाडा दुमदुमला

तटा तटा तुटती बंद
भिवईवर चढते धुंद

औट हात देहात अचानक वादळ घुसमटुनी जाते
उचंबळे हृदयात पुन्हा ते इतिहासाशी दृढ नाते

कळे मला काळाचे पाउल दृत वेगाने पुढती पडे
कळे मला क्षितिजाचे वर्तुळ क्षणोक्षणी अधिकचि उघडे

दहा दिशांचे तट कोसळले धृव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहू पसरुन अवघ्या विश्वाते कवळी

विशाल दारे माझ्या घरची खुशाल ही राहोत खुली
मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठी आंथरली

मात्र भाबड्या हृदयात
तेवत आहे जी ज्योत

ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुन झंझावात
कोटि कोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषात

वसंत बापट

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999